राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## राज्य आरोग्य सोसायटी, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

आरोग्य भवन, ३रा मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, मुंबई - ४००००१.

(नोंदणी क्र. २३९४/२००५, दि. २३ नोव्हेंबर, २००५)

### आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्प

### नोंदणीकृत अशासकिय संस्था / संघटनाकडून प्रस्ताव मागविणेसाठी जाहिरात

### अहमदनगर, यवतमाळ, भंडारा, सांगली, सिंधुदूर्ग (नविन विस्तारित जिल्हे) औरंगाबाद, सोलापूर (प्रकल्प कार्यक्षेत्र विस्तारित जिल्हे)

राष्ट्रीय आरोग्य अभियानामार्फत राज्यात आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख प्रकल्प राबविणेत येत आहे. प्रकल्पाच्या माध्यमातून लोकांमध्ये उपलब्ध सार्वजनिक आरोग्य सेवांच्या अधिकाराबद्दल जनजागृती घडविणे, लोकसहभाग मिळवून आरोग्य सेवांबद्दल हक्काधारित समज विकसित करणे या कामी अशासकिय संस्था / संघटनाची मदत घेतली जाते.

महाराष्ट्र शासनाकडून सदर प्रकल्पासाठी **अहमदनगर, यवतमाळ, भंडारा, सांगली, सिंधुदुर्ग** या जिल्ह्यांत विस्तार करणेस प्रत्येकी २ संस्था तसेच **औरगांबाद व सोलापूर** या जिल्ह्यात प्रकल्प कार्यक्षेत्र वाढविणेसाठी तालुका पातळीवर काम करणेस इच्छुक असणाऱ्या प्रत्येकी १ अशा नोंदणीकृत अशासकिय संस्था / संघटनाची निवड करणेसाठी प्रस्ताव मागविणेत येत आहे.

**अशासकिय स्वयंसेवी संस्था / संघटनांसाठी प्रस्ताव सादर करणेस खालील निकष -**

१. स्वयंसेवी संस्था / संघटना ही नोंदणीकृत असावी.

२. संस्था/ संघटना, गाव / तालुका / जिल्हा पातळीवर आरोग्य क्षेत्रात विविध प्रकल्पाच्या कामाचा अनुभव, तसेच आरोग्य क्षेत्रातील प्रशिक्षण देण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

३. लोकसहभागातून आरोग्य व इतर सामाजिक क्षेत्रात देखरेख ( **Monitoring** ), सामाजिक मूल्यमापन (**Social Audit**) तसेच जनसुनवाई (**Public Hearing**) असा कार्यक्रमाचा अनुभव असावा.

४. लोकाधारित देखरेख प्रक्रियेत ऐच्छिक पध्दतीने काम करणेचा अनुभव असलेल्या संस्था/संघटनांना प्राधान्य.

५. संस्था संघटनाचे कायक्षेत्र हे प्रस्ताव सादर करावयाच्या जिल्ह्यात असणे आवश्यक आहे.

**प्रस्तावासोबत जोडावयाची कागदपत्रे - (सदर प्रस्ताव ३ प्रतीत सादर करावा)**

१. संस्था नोंदणी प्रमाणपत्र

२. मागील ३ वर्षाचे ऑडिट रिपोर्ट व वार्षिक कृती अहवाल (सलग तीन वर्षे)

३. लोकसहभागातून आरोग्य आणि इतर सामाजिक क्षेत्रात हक्काधारित / देखरेख दृष्टीकोनातून कार्याचा अहवाल प्रस्तावात नमूद असावा.

४. आरोग्य व सामाजिक क्षेत्रात मूल्यमापन केल्याचे अहवालात स्पष्ट नमूद असावे.

५. आरोग्य किंवा इतर सामाजिक मुद्द्यांवर प्रशिक्षण दिल्याचा अहवाल असावा.

६. सामाजिक उत्तरदायित्व वाढविणेसाठी आरोग्य किंवा इतर सामाजिक मुद्यांवर जनसुनवाई या सारखा मोठा कार्यक्रम आयोजित केल्याचा अनुभव असावा. (उपक्रमाचे फोटो, प्रमाणपत्रे / वृत्तपत्र कात्रण असणे आवश्यक आहे.)

प्रस्ताव विहित नमून्यातील अर्ज सोबत जोडणे आवश्यक आहे. विहित नमूना अर्ज व माहिती पुस्तिका राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई येथील **www.nrhm.maharashtra.gov.in** तसेच साथी सेहत, पुणे या राज्य नोडल संस्थेच्या **www.sathicehat.org.** संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले आहेत.

विहित नमून्यातील परिपुर्ण असे प्रस्ताव दि.०८/५/२०१५ पर्यंत वरील नमूद पत्त्यावर नोंदणीकृत टपाल अथवा कुरीयरने प्राप्त होतील याची दक्षता घ्यावी. त्यानंतर आलेल्या व ईमेल द्वारा पाठविलेल्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही. प्रस्ताव निवडीचे सर्व अधिकार आयुक्त (कु.क.) व संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांनी स्वत:कडे राखीव ठेवले आहेत.

**आयुक्त (कु.क.) व संचालक**

**राष्ट्रीय आरोग्य अभियानमुंबई, महाराष्ट्र शासन**

## प्रस्तावना-

ग्रामीण व दुर्लक्षित तसेच गरजू जनतेस सहज साध्य व परवडण्याजोगी, कार्यक्षम व उत्तरदायी आणि विश्वासार्ह आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान सन २००५ पासून सुरुवात झाली आहे. सदर अभियानाची वाटचाल दुस-या टप्यात देखील सुरु असून आरोग्य सेवांचे बळकटीकरण, आरोग्य सेवा पुरविणारे विशेषज्ञ, पायाभूत सुविधा विकास करणे, मोफत व पुरेसा प्रमाणात औषधे पुरविणे, प्रयोगशाळा तसेच तात्काळ संदर्भ सेवा ई निर्माण करण्यात आलेल्या आहेत. या सर्व बाबीकरिता केंद्र शासनाकडून प्रकल्प अंमलबजावणी आराखडयामार्फत निधी देखील उपलब्ध केला जातो.

राज्यात एकदंरीत केंद्र शासनाच्या मदतीने अभियानामार्फत बालमृत्यू कमी करणे,माता मृत्यू कमी करणे, लोकसंख्या वाढीत नियत्रण करणे तसेच ग्रामीण भागात गुणवंत्ता पुर्णसेवा पुरविणे हे अभियानाचे प्रमुख उद्दिष्टे ठेवण्यात आले होते.

ग्रामीण भागातील जनतेस आरोग्य सेवा सुरळीतपणे उपलब्ध होत आहे किंवा नाही यावर अभ्यास करणेसाठी आरोग्य सेंवावर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्पाची सुरुवात करण्यात आली. सदर प्रकल्प राज्यातील एकूण १३ जिल्हयातील २३ स्वयंसेवी संस्थाच्या माध्यमातून सुरु असून प्रकल्पाचा विस्तार टप्याटप्याने करण्यात येत आहे.


### ➢ आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख प्रक्रिया-

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन (Community Based Monitoring & Planning of Health Services)प्रकल्पाच्या माध्यमातून जनतेला गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा मिळाव्यात. त्या सेवेच्या गुणवत्तेत सुधारणा होवून निश्चित चांगला दर्जा राखता यावा यासाठी महाराष्ट्रशासन सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. राग्राअ १००७/प्र. क्र. १७२/आरोग्य - ७, दि. २४ ऑगस्ट, २००७ महाराष्ट्रात देखरेख प्रकल्प सुरु करण्यात आलेला आहे.

### ➢ प्रकल्पातील महत्त्वपूर्ण उद्दिष्टे -

१. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत येणारे व उपलब्ध आरोग्य सेवांचे अधिकार याबद्दल जनतेमध्ये जागृती घडविणे.
२. आरोग्य सेवेतील नियोजनात लोकसहभाग मिळविणे व त्यांच्यात पालकत्वाची भावना वाढीस लावणे.
३. आरोग्य सेवेच्या सनियंत्रणासाठी जनतेत हक्काधारित समज विकसित करणे त्यातून लोकाधारित देखरेखीचे माध्यमे विकसित करणे.

### ➢ प्रकल्पाचे कार्यक्षेत्र -




- देखरेखप्रकल्पाची अंमलबजावणीसाठी कार्यक्षेत्र म्हणून **अमरावती, नंदूरबार, उस्मानाबाद, पुणे आणि ठाणे तसेच औरंगाबाद, बीड, चंद्रपूर, गडचिरोली, कोल्हापूर, नाशिक, रायगड आणि सोलापूर** असे एकूण १३ जिल्ह्यांचा समावेश केला आहे.
- ऐच्छिक पध्दतीने प्रकल्पाच्या उपक्रम राबविणेस **कोकण- ३, उत्तर महाराष्ट्र- ४, मराठवाडा- ६, पश्चिम महाराष्ट्र- ५, विदर्भ- १४, असे एकूण ३२** अशासकिय संस्थाची निवड करण्यात आली आहे.

### ➢ कार्यक्षेत्र निवडीचे निकष-

- प्रत्येक जिल्ह्यातील तीन तालुके
- निवडलेल्या तालुक्यात तीन प्राथमिक आरोग्य केंद्र व त्याचे कार्यक्षेत्र
- निवडलेल्या प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रातील पाच गावांचा समावेश करण्यात येतो.

### ➢ राज्य समन्वयक संस्था-

प्रकल्प अंमलबजावणीची संपूर्ण जबाबदारी राज्य नोडल संस्था म्हणून साथी सेहत, पुणे संस्थेला देण्यात आली आहे. साथी सेहत, पुणे जिल्हा व तालुका समन्वयक संस्थांना प्रशिक्षणे, तांत्रिक बाबींची माहिती पुरविणे, क्षमता बांधणी करणे इ. जबाबदा-या पूर्ण करीत असते.

### ➢ प्रकल्पातील महत्त्वपूर्ण उपक्रम –

१. प्रकल्पातील उपक्रम जिल्हा व तालुका असे तीन टप्यात कालमर्यादेत आयोजित केले जातात.
२. राज्यपातळीवरील उपक्रम पुर्ण करण्याची जबाबदारी राज्य समन्वयक संस्थेची असली तरी राज्य आरोग्य सोसायटी पूर्णपणे सहकार्य करीत असते.
३. जिल्हा पातळीवरील उपक्रम जिल्हा व तालुका समन्वयक संस्था करित असते.
४. तालुका तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र पातळीवरील उपक्रम राबविणेस तालुका आरोग्य सोसायटी व प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकिय अधिकारी सहकार्य करतात.

### १. प्रशिक्षण आयोजित करणे –

गाव पातळीवरील VHNSC समिती सदस्य, रुग्ण कल्याण समिती सदस्य, पंचायत राज प्रतिनिधी यांचे एक दिवसीय प्रशिक्षण आयोजित करण्यात येते. सदर प्रशिक्षणात राष्ट्रीय आरोग्य अभियानातील विविध आरोग्य विषयक योजना तसेच गावपातळीपर्यंत उपलब्ध होणारा निधी याबद्दल माहिती दिली जाते. तसेच, उपलब्ध निधीच्या खर्चाचे नियोजन कसे करता येईल याबद्दल जनजागृती केली जाते. तसेच नियोजन प्रक्रियेच्या माध्यमातून नवीन उपक्रम सुचविण्यात येतात.

**२. गाव पातळीवर जनजागृती कार्यक्रम करणे –**

स्वयंसेवी संस्था गाव पातळीवर आरोग्य विषयक कार्यक्रमाची जनजागृती करित असते त्यात गाव बैठका घेणे,विविध आरोग्य विषयक योजना, शासकिय धोरणे, शासन निर्णय, प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावरील मिळणा-या आरोग्य सेवांची माहिती लोकापर्यंत पोहचवण्याच्या अपेक्षेने कार्यक्षेत्रात कार्यक्रम घेत असते.

**३. प्रचार प्रसारसाठी IEC साहित्ये पुरविणे –**

देखरेख प्रकल्पाच्या माध्यमातून स्वतंत्र माहिती, शिक्षण, व संवाद (IEC)साहित्ये छपाई करण्यात येते आणि कार्यक्षेत्रातील स्थानिक ग्रामपंचायत, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र, शाळा इ.सार्वजनिक ठिकाणी लावण्यात येते.

शासन स्तरावरून आरोग्य योजना बद्दल माहिती प्रसारित केली जाते. याकरिता स्वयंसेवी संस्थांची मदत करित असते.

**४. प्रकल्पातील विविध समित्याची गठीत करुन कालमर्यादेप्रमाणे बैठकाचे आयोजन करणे.**

**त्रिस्तरीय देखरेख व नियोजन समितीची बांधणी –**

| आरोग्य सेवांवर देखरेख व नियोजन समितीचा स्तर | त्रिस्तरीय गट |
|---|---|
| **प्राथमिक आरोग्य केंद्र** | १. प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यकक्षेतील गावामधून पंचायत समितीवरील निर्वाचित व्यक्ती या समितीचे अध्यक्ष म्हणून कामकाज पाहतात.<br>२. प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकि अधिकारी हे कार्याध्यक्ष असतात.<br>३. सचिव म्हणून स्वयंसेवी संस्था संघटनांचे प्रतिनिधी काम पाहतात.<br>४. या समितीत किमान १० ते १४ सभासद अपेक्षित. |
| **तालुका स्तर** | १. पंचायत समिती सभापती या समितीचे अध्यक्ष म्हणून काम पाहतात.<br>२. तालुका वैद्यकिय अधिकारी या समितीचे कार्याध्यक्ष असतात.<br>३. सचिव म्हणून तालुका स्तरावरील स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी काम पाहतात.<br>४. या समितीत किमान १५ सभासद अपेक्षित. |
| **जिल्हा स्तर** | १. जिल्हा परिषदेच्या आरोग्य समितीचे सभापती या समितीचे अध्यक्ष म्हणून काम पाहतात.<br>२. कार्याध्यक्ष म्हणून जिल्हा आरोग्य अधिकारी असतात.<br>३. सचिव म्हणून जिल्हास्तरीय संस्था प्रतिनिधी म्हणून काम पाहतात.<br>४. या समितीत किमान २० सभासद अपेक्षित. |

**(शासन निर्णय २००८ प्रमाणे समितीचा विस्तार करण्यात येतो.)**

**४. सुकाणू समिती बैठक आयोजित करणे –**

प्रकल्प राबविणेस योग्यती दिशा मिळावी यासाठी जिल्हा पातळीवर सुकाणू समितीची स्थापना करण्यात आली आहे. सदर समिती देखरेख प्रक्रिया पुढे जाण्यासाठी धोरणात्मक मुद्दयांवर चर्चा करून उपाययोजना सुचवित असते.सुकाणू समिती रचनेत जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे अध्यक्ष असतात. उपाध्यक्ष म्हणून जिल्हा परिषदेतील आरोग्य सभापती, स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी सदस्य तर

जिल्हा आरोग्य अधिकारी सदस्य सचिव म्हणून काम पाहत असतात. या समितीच्या वर्षातून किमान तीन बैठका घेतल्या जातात.

**५. प्रकल्पातील दिशानिर्देशन कार्यशाळा –**

आरोग्य क्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी तसेच स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी, देखरेख व नियोजन समिती सदस्य यांच्याकरिता एक दिवशीय कार्यशाळा आयोजित करणे. जेणेकरून, प्रकल्पाची संपूर्ण होणेकरिता दिशानिर्देशन कार्यशाळा घेतली जाते. त्यातून आरोग्य सेवेवरील त्रुटीवर उपाययोजना करणेस चालना मिळत असते. सदर कार्यशाळा स्वयंसेवी संस्था आपल्यास्तरावर आयोजित करीत असतात.

**६. माहिती संकलन करणे –**

देखरेख प्रकल्प कार्यक्षेत्रातील गावे, उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण व जिल्हा रुग्णालये या ठिकाणातून स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी, देखरेख व नियोजन समिती सदस्यांमार्फत आरोग्य सेवेवरील सोईसुविधा इ. माहिती घेतली जाते. याकरिता माहिती संकलन साहित्याचा वापर केला जातो. सदर माहिती आरोग्य संस्थांनी पडताळणी करून देणे अपेक्षित आहे.

**७. जनसुनवाई/जनसंवाद आयोजित करणे –**

संकलित केलेल्या माहितीच्या आधारावर आरोग्य सेवेतील त्रुटीवर प्रथमतः प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी जनसुनवाई आयोजित करावी. जनसुनवाईसाठी पॅनल तयार केले जाते. जनसुनवाईमध्ये देखरेख समितीचे सदस्य, आरोग्य सेवेतील अडचणी मांडतात. त्यावर चर्चा केली जाते आणि उपाययोजना सुचविल्या जातात. ज्या अडचणी प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर सुटणार नाहीत त्या अडचणी जिल्हा जनसुनवाईत मांडणे अपेक्षित आहे. जिल्हा पातळीवर शक्यतो उपस्थित मुद्दयांवर त्वरित कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

धोरणात्मक मुद्दे राज्यपातळीवरील जनसंवाद कार्यक्रमात चर्चेस येणे अपेक्षित आहेत. वरिष्ठ पातळीवर धोरणात्मक मुद्दयांवर उपाययोजना सुचविल्या जातात. तसेच, मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या जातात. जनसुनवाई कार्यक्रमासाठी आरोग्य संस्था प्रमुख तसेच आरोग्य क्षेत्रातील वरिष्ठ अधिका-यांनी उपस्थित राहून उपाययोजना सुचविणे अपेक्षित आहे.

- **प्रकल्पातील निधी–**

लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्पास केद्र शासन,नवी दिल्ली मार्फत प्रकल्प अंमलबजावणी आराखडा मंजूरी नंतर राज्य आरोग्य सोसायटीकडून थेट निधी राज्य समन्वयक संस्थेस वितरित केला जातो.यासाठी विहित नमून्यात करारनामा केला जातो. राज्य समन्वयक संस्थेकडून जिल्हास्तरावरील संस्थाना निधी वितरित केला जातो. त्यासाठी देखील करारनामा प्रक्रिया पुर्ण करावी लागते.

- **अशासकिय संस्थाची निवड करावयाची प्रक्रिया–**

प्रकल्पाच्या विस्तारासाठी स्थानिक जिल्हयातील अशासकिय संस्था/ संघटनाकडून प्रस्ताव मागविणेसाठी वृत्तपत्राव्दारे जाहिरात प्रसिध्द केली जाते. प्रसिध्द जाहिरातीमधील अटी,शर्ती नुसार व विहित मुदतीत प्राप्त प्रस्तावाची प्राथमिक छाननी राज्यस्तरावरील तांत्रिक छाननी समितीमार्फत (Technical Appraisal Committee) केले जाईल. छाननीमध्ये विहित नमुन्यातील परिपुर्ण असा अर्ज, अनुभव, संस्थामधील आर्थिक बल कार्यक्रमाचा इ. बाबीचा तपशिल तपासुन घेतला जातो.

प्राथमिक छाननीत पात्र ठरलेले प्रस्ताव संयुक्त मुल्यांकन समिती (Joint Appraisal Committee) कडे तपासणीसाठी पाठविणेत येतात. संयुक्त मुल्यांकन समिती ही जिल्हास्तरावर जिल्हा आरोग्य सोसायटी मधील वरीष्ठ अधिकारी, तसेच कार्यरत स्वयसेवी संस्था प्रतिनिधी असतात.या समितीचा अहवालावर जिल्हयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अतिंम शिफारस करुन सदर प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी राज्यस्तरावरील संस्था निवडसमितीचे शिफारस केली जाते.

राज्यस्तरावर संस्था निवड समिती ही आयुक्त (कु.क) व संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली समितीअसून सदर समिती जिल्हास्तरावरील सयुक्त मुल्यांकन समितीव्दारा प्राप्त प्रस्तावावर बैठक घेऊन चर्चा करित असते. सदर समितीसमोर सर्व पात्र संस्था आपल्या कामाचे सादरीकरण करते. त्यानंतर अतिंम निवड केली जाते.

➢ **अशासकिय स्वयंसेवी संस्था/संघटनांना प्रस्ताव सादर करणेकरिता निकष -**

१. स्वयंसेवी संस्था/संघटना ही नोंदणीकृत असावी.
२. संस्था/संघटना,गाव/तालुका/जिल्हा पातळीवर आरोग्य क्षेत्रात विविध प्रकल्पाच्या कामाचा अनुभव, तसेच आरोग्य क्षेत्रातील प्रशिक्षण देण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.
३. लोकसहभागातून आरोग्य व इतर सामाजिक क्षेत्रात देखरेख (Monitoring), सामाजिक मूल्यमापन (Social Audit) तसेच जनसुनवाई (Public Hearing) अशा कार्यक्रमाचा (कामाचा) अनुभव असावा.
४. लोकाधारित देखरेख प्रक्रियेत ऐच्छिक पध्दतीने काम करणेचा अनुभव असलेल्या संस्था/संघटनांना प्राधान्य.
५. संस्था / संघटनाकडे प्रशिक्षित कर्मचारी असावेत.
६. संस्था संघटनाचे कार्यक्षेत्र हे प्रस्ताव सादर करावयाच्या जिल्ह्यात असणे आवश्यक आहे.
७. किमान मागील ५ वर्षापासून त्याच कार्यक्षेत्रात काम करित असल्याचा अनुभव असावा.
८. सदर कार्यक्षेत्रात आरोग्य व इतर विषयावर कामाचा
९. सामाजिक मूल्यमापन केल्याचे अहवालात स्पष्ट नमूद असावे.
१०.आरोग्य किंवा इतर सामाजिक मुद्द्यांवर प्रशिक्षण दिल्याचा अहवाल असावा.
११.सामाजिक उत्तरदायित्व वाढवणेसाठी आरोग्य किंवा इतर सामाजिक मुद्द्यांवर जनसुनवाई या सारखा मोठा कार्यक्रम आयोजित केल्याचा अहवाल असावा. (उपक्रमाचे फोटो, प्रमाणपत्रे/वृत्तपत्र कात्रण असणे आवश्यक आहे.)

➢ **निवडीस पात्र ठरलेल्या संस्था/ संघटनासाठी महत्वाचे-**

- जिल्हास्तरावर निवड झालेल्या संस्थाना राज्य पातळीवरुन निवड प्रक्रिया पुर्ण झाल्याचे आदेश दिले जातील. सदर आदेश चालू आर्थिक वर्ष म्हणजेच ३१ मार्च पर्यत लागू राहते.
- जिल्हा/तालुका पातळीवर काम करणेस राज्य समन्व्यक संस्थासोबत करारनामा केला जातो. करारपत्रासाठी आवश्यकती माहिती/कागदपत्र राज्य समन्वयक संस्थेकडे सादर करणे आवश्यक आहे.
- राज्यपातळीवर थेट अनुदान वितरित केले जात नसल्याने करारनामा प्रकिया पुर्ण करण-या संस्थेला राज्य समन्वयक संस्था मंजूर प्रकल्प अंमलबजावणी आराखडयानुसार अनुदान वितरीत करित असते.

- राज्य आरोग्य सोसायटी,कार्यक्रमासंबधी विविध परिपत्रके, मार्गदर्शक सुचना निर्गमित करते त्यानुसार जिल्हास्तरावरील कार्यक्षेत्रात प्रकल्पाची अमंलबजावणी केली जाते.

➢ **निवड झालेल्या संस्था /संघटनाकडून कार्यक्षेत्रात करावयाच्या कामाची अपेक्षा-**

❖ **जिल्हा स्तरावरील उपक्रम-**

- जिल्हा सुकाणू समितीच्या वर्षभरात किमान ३ बैठका आयोजित करणे. बैठकीचा अहवाल तयार करुन उपस्थित मुद्दयांवर जिल्हा स्तरावरील अधिका-यासोबत चर्चा करुन निकाली काढणेस पाठपूरावा करणे.
- जिल्हा देखरेख व नियोजन समितीच्या वर्षभरात किमान ३ बैठका आयोजित करणे. बैठकीचा अहवाल तयार करुन उपस्थित मुद्दयांवर जिल्हा स्तरावरील अधिका-यासोबत चर्चा करुन निकाली काढणेस पाठपूरावा करणे.
- जिल्हा व तालुका स्तरावरील संस्था/ संघटनानी दर दोन महिन्यात किमान एक बैठक आयोजित करुन उपक्रमावरील नियोजन करावे.
- मानसेवी कार्यकर्त्याचे क्षमता बांधणी व कौशल्या वाढविणेसाठी कार्यशाळा आयोजित करावी.
- देखरेख प्रक्रियेचा बळकटीकरणास योग्य तो प्रचार,प्रसार करणेत यावा.
- कार्यक्षेत्र विस्तारासाठी जिल्हा सुकाणू समितीच्या बैठकीत प्रस्ताव ठेवण्यात यावा. तसेच जिल्हयातील प्रमुख अधिका-यासमवेत चर्चा करुन निर्णय पारित करावा.
- प्रकल्पाच्या महत्वाचा भाग म्हणून जिल्हास्तरावरील आरोग्य संस्थाची माहिती गोळा करणे, रिपोर्ट कार्ड भरणे, भरलेले रिपोर्ट कार्ड रुग्णालयाच्या दर्शनी भागात सर्व सामान्य जनतेस व रुग्णालयातील अधिकारी, कर्मचारी यांच्या निर्दशनास येईल अशा ठिकाणी लावणेत यावी.
- आरोग्य संस्थामधील अधिकारी, कर्मचारी यांची जबाबदारी नेमण्यात आली असून त्याप्रमाणे सेवा दिली जाते किंवा नाही याबाबत पाठपुरावा करणे व याबाबत वरीष्ठ अधिका-यांच्या निर्दशनास आणून देणे.
- भरलेल्या रिपोर्ट कार्डाच्या आधारे रुग्णालयाच्या आवारात जनसंवाद/ जनसुनवाई या सारखा महत्वाचा कार्यक्रम आयोजित करणे.
- आरोग्य सेवेतील महत्वाचे व सुटण्याजोगे त्रृटीचे मुद्दे यांचे दस्ताऐवज करणे. ते सोडविण्यासाठी केलेले प्रयत्न, सकारात्मक बाबी जनसंवाद कार्यक्रमाच्या माध्यमातून मांडणेत यावे.
- न सुटलेले मुद्दे निकाली काढणेस पाठपुरावा करणे,

❖ **तालुकास्तरावरील उपक्रम-**

- जिल्हा सुकाणू समितीच्या मान्यतेने निवडण्यात आलेले कार्यक्षेत्रातील गावे, प्राथमिक आरोग्य केंद्र, आणि तालुका पातळीवर काम करणारे आरोग्य अधिकारी, कर्मचा-यांना प्रकल्पाची माहिती होणे व त्यांचा सहभाग वाढविणे करिता कार्यशाळा आयोजित करावी.
- नवीन कार्यक्षेत्रात तालुका पातळीवर देखरेख व नियोजन समितीची स्थापना करावी.
- देखरेख व नियोजन समिती सदस्याची प्रक्रिया व त्यांच्या जबाबदा-यांची माहिती होणेकामी प्रशिक्षण आयोजित करावे.
- तालुका देखरेख व नियोजन समिती सदस्य, रुग्ण कल्याण समिती सदस्य, स्थानिक लोकप्रतिनिधी यांची एकत्रित नियोजन कार्यशाळा आयोजित करावी.
- रुग्ण कल्याण समिती सदस्य यांचे करिता एक दिवशीय कार्यशाळा घेण्यात यावी त्यात समितीचे अधिकार, कर्तव्ये, उपलब्ध निधी व निधीच्या खर्चा संदर्भात मार्गदर्शक सुचना काय आहेत. सध्यांच्या

खर्चाची परिस्थिती कशी आहे व पुढील नियोजन कसे करता येईल या विषयीची माहिती कार्यशाळेच्या माध्यमातून करण्यात यावी.

- प्रकल्पाच्या महत्वाचा भाग म्हणून तालुका स्तरावरील आरोग्य संस्थाची माहिती गोळा करणे, रिपोर्ट कार्ड भरणे, भरलेले रिपोर्ट कार्ड रुग्णालयाच्या दर्शनी भागात सर्व सामान्य जनतेस व रुग्णालयातील अधिकारी, कर्मचारी यांच्या निर्दशनास येईल अशा ठिकाणी लावणेत यावी.
- आरोग्य संस्थामधील अधिकारी, कर्मचारी यांची जबाबदारी नेमण्यात आली असून त्याप्रमाणे सेवा दिली जाते किंवा नाही याबाबत पाठपुरावा करणे व याबाबत वरीष्ठ अधिका-यांच्या निर्दशनास आणून देणे.
- भरलेल्या रिपोर्ट कार्डाच्या आधारे रुग्णालयाच्या आवारात जनसंवाद/ जनसुनवाई या सारखा महत्वाचा कार्यक्रम आयोजित करणे.
- तालुका पातळीवर पुढे येणारे मुद्दे, नाविण्यपुर्ण गोष्टी, न सुटलेल्या मुद्यांना प्रसिध्दी देण्यासाठी विविध प्रकाशने तयार करावीत.

**❖ प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावरील उपक्रम-**

- प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावरील देखरेख व नियोजन समितीची स्थापना करणेत यावी.
- देखरेख व नियोजन समिती सदस्याना प्रक्रिया व त्यांच्या जबाबदारी याविषयी माहिती होणे करिता प्रशिक्षण देणे.
- देखरेख व नियोजन समिती सदस्यासोबत प्राथमिक आरोग्य केंद्राची पाहणी करणे व प्रश्नावली भरणे, रिपोर्ट कार्ड तयार करणे, तयार झालेला रिपोर्ट कार्ड प्रा.आ.केंद्राच्या दर्शनी भागात लावणे.
- गोळा केलेल्या माहितीच्या आधारे मुद्दयांवर संबधीत शासकिय अधिकारी यांच्या उपस्थितीत जनसंवाद/जनसुनवाई आयोजित करणे. व न सुटलेल्या मुद्यांवर चर्चा करुन ठोस उपाय सुचविणे,तसा अहवाल तयार करणे.
- प्रा.आ.केंद्र कार्यक्षेत्रातील लोकप्रतिनिधीचा देखरेख प्रक्रियेत सहभाग वाढविणेस प्रयत्न करणे.

**❖ गाव पातळीवरील उपक्रम-**

- निवडलेल्या कार्यक्षेत्रातील गावात गाव आरोग्य आराखडा तयार करणे.
- गाव,आरोग्य, पोषण व पाणीपुरवठा स्वच्छता समिती गठीत करणे, विस्तार करणे, व बळकटीकरण करणे व प्रशिक्षणाची व्यवस्था करणे.
- गावातील चांगले आरोग्य कसे निर्माण करता येईल याविषयावर गाव बैठकाचे आयोजन करुन ग्रामसभेत व्दारे ठराव मांडणे व विचारात घेणे आणि उपाययोजना सुचविणे.
- प्राआकेद्र, उपकेंद्र, याठिकाणी भेटी देवून सोईसुविधाची सद्यस्थिती जाणून घेणे. उपाययोजना सुचवून अमंलबजावणी करणेस भाग पाडणे.
- आरोग्य विषयावर गाव पातळीवर जनजागृती करणे.
- गाव पातळीवरील सोईसुविधाबाबत रिपोर्ट कार्ड तयार करुन अहवाल ग्रामपंचायत, अंगणवाडी, उपकेद्राच्या दर्शनी भागात प्रसिध्द करणे.
- गाव पातळीवरील समिती, लोकप्रतिनिधी आरोग्य कर्मचारी यांचा सहभाग वाढविणे व सोई सुविधा याबाबत चर्चा करुन मुद्दे निकाली काढणे.

**टिप- आयुक्त (कु.क) व संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे कार्यालयामार्फत लोकाधारित देखरेख प्रकल्पासंबधी माहिती जाणून घेणे करिता जनहितार्थ प्रसिध्द.**

राष्ट्रीय आरोग्य अभियान
आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्प

## - प्रस्ताव नमुना फॉर्म -

### अ) सर्वसाधारण माहिती -

१. संस्था प्रमुखाचे नाव - ----------------------------------------------------

२. संस्थेचे नाव व पत्ता - ------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------
--------------------------------------------(संपुर्ण पत्ता आवश्यक आहे.)

३. दूरध्वनी क्र - --------------------- भ्रमणध्वनी क्र - -----------------------

४. इमेल - ---------------------------------------------

### आ) प्रस्तावासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे

१. संस्था नोंदणी प्रमाणपत्र सोबत जोडावीत.

**अ.** सन १९५० मुंबई संस्था नोंदणी अधिनियन, अन्वये,नोंदणी क्र. ---------
नोंदणी वर्ष --------------

**ब.** सन १८६० चा संस्था नोंदणी अधिनियम अन्वये,नोंदणी क्र. -------------
नोंदणी वर्ष --------------

२. FCRA /१२ अ, प्रमाणपत्र असल्यास सोबत जोडावेत

३. मागील ३ वर्षाचे ऑडिट रिपोर्ट सनदी लेखापाल द्वारा प्रमाणित करुन प्रती सोबत जोडावीत.

| वर्ष | उत्पनाचे स्त्रोत | एकूण वार्षिक उत्पन्न |
|---|---|---|
| २०११-१२ | | |
| २०१२-१३ | | |
| २०१३-१४ | | |
| इतर. | | |

४. सनदी लेखापरिक्षण अहवाल धर्मदाय आयुक्त कार्यालयास सादर केल्याची वर्षनिहाय पावत्या सोबत जोडावीत.

५. मागील तीन वर्षात संस्था इन्कम टॅक्स रिटर्न करित असल्यास त्यांसंबधी पावत्या सोबत जोडाव्यात.

६. स्वयंसेवी संस्थांचे कार्यक्षेत्र असलेला जिल्हा - ---------------------
(**संस्था जाहिरातीत नमूद असलेल्या जिल्ह्यातच कार्यरत असावी.**)

७. स्वयंसेवी संस्थामार्फत मागील तीन वर्षात राबविण्यात आलेल्या प्रकल्पासंबधी कृती अहवाल (वर्षनिहाय अहवाल जोडणे आवश्यक आहे.)

८. ऐच्छिक पध्दतीने केलेल्या कामाचा अनुभव (सोबत अहवालाची प्रत,आदेशाची प्रत किंवा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद यांचे प्रमाणपत्र जोडावे.)

९. प्रस्तावासोबत वृत्तपत्रातील प्रसिध्द बातमी/जाहिराती/कात्रणे/कार्यक्रमाचे महत्वाचे फोटो इ. आवश्यक आहेत.

**इ) सामाजिक संस्थेमार्फत राबविण्यात येत असलेले उपक्रम**

| अ. क्र. | उपक्रम | प्रकल्प/ उपक्रमाचा कालावधी | प्रकल्प मंजूर करणा-या समाजिक संस्था/ कार्यालयाचे नाव | एकूण निधी |
|---|---|---|---|---|
| १. | सामाजिक मूल्यमापन (Social Audit) | | | |
| २. | सामाजिक क्षेत्रात देखरेख (Social Monitoring) | | | |
| ३. | सामाजिक क्षेत्रात जनसंवाद (Public Hearing) | | | |
| ४. | आरोग्य क्षेत्रातील मूल्यंमापन (Evaluation) | | | |
| ५. | आरोग्य क्षेत्रातील देखरेख | | | |
| ६. | आरोग्य क्षेत्रातील जनसुनवाई/जनसंवाद कार्यक्रम | | | |
| ७. | जनजागृती कार्यक्रम | | | |
| ८. | देखरेख प्रक्रिये संबधी ऐच्छिक कामाचा तपशिल | | | |
| ९ | इतर | | | |

**ई) स्वयंसेवी संस्थेकडे सद्यस्थितीत सुरु असलेले प्रकल्प –**

| अ. क्र. | प्रकल्पाचे नाव | शासकिय/निमशासकिय/ चॅरेटी/वैद्यकिय/फॉरेन फंडीग | प्रकल्पाचा कालावधी | अनुदान रक्कम (रु.) | उपलब्ध मनुष्यबळ (संख्या) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**उ) संस्थेकडे कार्यरत व्यक्ती/कार्यकर्त्यांची माहिती –**

| अ. क्र | कर्मचा-यांचे नाव | पद | शैक्षणिक अर्हता | अनुभव | वार्षिक वेतन |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

(संस्थेकडे लेखा विषयक बाबी हाताळणी करणारा कर्मचारी आवश्यक आहे.)

**ऊ) संस्था कार्यरत असलेल्या कार्यक्षेत्रातील नजीकचे प्राआकेंद्र/ उपकेद्राबाबत माहिती.**

| आरोग्य संस्था | एकूण | एकूण अंतर (किमी) |
|---|---|---|
| उपकेंद्र | | |
| प्राआकेंद्र | | |
| ग्रामीण रुग्णालय | | |

ऋ) संस्थेकडे उपलब्ध साधन सामग्री

| अ. क्र. | तपशिल | एकूण | शेरा |
|---|---|---|---|
| १. | प्रशिक्षण हॉल | | |
| २. | एलसीडी/प्रोजेक्टर | | |
| ३. | कॉम्प्युटर | | |
| ४. | लॅपटॉप | | |
| ५. | संस्थेकडे स्वतःच्या मालकीची इमारत | | |
| ६. | दूरध्वनी | | |
| ७. | इतर | | |

समंतीपत्र

सस्था प्रमुखाचे नाव - --------------- संस्थेचे नाव - --------------------------------- जि. ------------- राष्ट्रीय आरोग्य अभियान अतंर्गत लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्पासाठी जाहितीमधील नमूद जिल्हयात आमची संस्था स्थानिक संस्था म्हणून कार्यरत असून आमची संस्था सामाजिक व आरोग्य क्षेत्रात हक्काधारित दृष्टिकोनातून काम करित आहे. किंवा अनुभव आहे. सदर प्रकल्पाचे काम करणेस आमची संस्था इच्छूक आहे. वृत्तपत्रावरील जाहिरातीच्या अटी/शर्तीनुसार तसा प्रस्ताव सादर करित आहे.

उपरोक्त प्रस्तावासोबत दिलेली माहिती खरी/ अचूक असून चुकीची आढळल्यास प्रस्ताव रद्द करणेस आमची संमती आहे.

स्वाक्षरी/शिक्का

अध्यक्ष/सचिव

संस्थेचे नाव-----------------------------

पत्ता----------------------------------

**************